सायं. दैनिक
बीड किसान
आवाज जनसामान्यांचा..
• संपादक : शेख कामरान •

७९ वा स्वातंत्र्य दिवस
स्वातंत्र्यदिन चिरायू होवो...

बीड ▪ वर्ष ५ ▪ अंक ९९ ▪ गुरुवार, दि. १४ ऑगस्ट, २०२५ ▪ पोस्टल दिनांक १५ ऑगस्ट, २०२५ ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ पाने ४ ▪ किंमत २ रु.
BEED ▪ Year-5 ▪ Issue-99 ▪ Thursday 14 August, 2025 ▪ Postal Date 15 August, 2025 ▪ RNI : MAHMAR/2021/80738 ▪ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ▪ Pages 4 ▪ Price 2

## गेवराईतून वाळूची वाहतूक होतेय चकलांबा हद्दीत दोन ट्रॅक्टर पकडले जातात मग गेवराईचे पोलीस हप्ते खात नाही तर काय?

# एसपींनी कमावलेली किंमत खालची यंत्रणा चार पैशांसाठी मातीत मिसळायली!

### म्हाळस पिंपळगाव येथे किमान २० केण्या सुरु; सगळी पोलीस यंत्रणा मॅनेंज!

## एसपी साहेब वाळूची चोरटी वाहतूक होतेय आतातरी मान्य करणार की, नाही?



**बीड । किसान न्युज**

गेवराई तालुक्यातून चोरटी वाळू वाहतूक प्रशासनाच्या नाकावर टिच्चून सुरू आहे. पण यावर कारवाई न करता काहीच सुरु नाही अशा आविर्भावात यंत्रणा वागत आहे. पण काल चकलांबा पोलिसांनी चोरटी वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडल्याने चोरटी वाळू सुरू आहे हे एसपी साहेब मान्य करुन यंत्रणेला टाईट करण्याची गरज असून, एसपी साहेब तुम्ही अवैध धंदे बंद करुन जनसामान्यांमध्ये तुम्ही कमावलेली किंमत चार पैशांसाठी मातीत घालीत




असल्याने लक्ष देण्याची गरज असल्याची चर्चा सुरू आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पदभार घेताच त्यांच्या समोर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी रोखून शांतता निर्माण करण्याचे आव्हान होते. गुन्हेगारीला रोखण्यासाठी अवैध धंदे बंद होणे आवश्यक असल्याचे त्यांच्या अनुभवातून पहिल्याच ठाणे प्रमुखांच्या बैठकीत सर्व पोलीस ठाणे हद्दीतील सर्वच प्रकारचे अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिले. जिथे अवैध धंदे सुरू दिसतील त्या ठाणे प्रमुखावर कारवाई करणार असल्याचे सांगितले होते. यामुळे जिल्ह्यातील अनेक अवैध धंदे बंद झाले. तसेच कधी » पान २ वर

### हंबर्डे चे सीडीआर तपासा

**गेवराई पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकाऱ्यांचा हंबर्डे नामक एक कर्मचारी असून, तो नियमित वाळू माफियांच्या संपर्कात असतो अशी जोरदार चर्चा गेवराई तालुक्यात सुरू आहे. यामुळे पोलिसांच्या कारभारावर संशय निर्माण होत आहे. यांचे काय लागेबांधे आहेत, गेवराई पोलीस ठाण्यात अवैध वाळू उपसा आणि वाहतूक सुरु आहे की, नाही? हे उघडच करायचे असेल तर हंबर्डे नामक पोलीस कर्मचाऱ्याचे सीडीआर तपासावेत यामुळे सर्व चित्र स्पष्ट होईल असे सांगितले जात आहे.**

## लोकनेत्यास अभिवादन...!



बीड : शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष शेवटच्या श्वासापर्यंत समाजाच्या हितासाठी संघर्ष करणारे माजी आ. स्व. विनायकराव मेटे यांचा आज स्मृतीदिन असून या निमित्ताने या गोरगरीबांचा कैवारी म्हणून जनसामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या लोकनेत्यास त्रिवार अभिवादन...

– किसान परिवार, बीड

## लोकनेते विनायकराव मेटे यांना पुण्यतिथी निमित्त श्रद्धांजली अर्पण



**बीड । किसान न्युज**

शिवसंग्राम चे संस्थापक अध्यक्ष लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त बीड येथील त्यांच्या स्मृतीस्थळी त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली याप्रसंगी सामाजिक, राजकीय आणि समाजातील विविध घटकातील मान्यवर मोठ्या उपस्थित होते. मराठा आरक्षणासह मुस्लिम, धनगर आरक्षणासाठी अविरत लढा देणारे लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांचा १४ ऑगस्ट २०२२ साली मराठा आरक्षणासाठी होऊ घातलेल्या मुंबई येथील बैठकीला जाताना दुर्दैवी अपघात झाला यात त्यांची प्राणज्योत मालवली. बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेल्या विनायकराव मेटे यांचा जन्म राजेगाव या गावी झाला पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईत मोलमजुरी करण्यासाठी गेलेल्या मेटे साहेबांनी ३५ वर्ष राजिकाय » पान २ वर

## शहरातील मिल्लीया शाळेच्या मुख्याध्यापकावर कारवाईच्या मागणीसाठी आमरण उपोषण

**बीड । किसान न्युज**

येथील मिल्लीया शाळेतील चार शाळेच्या मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याचे आदेश असतानाही बीड शिक्षण विभाग अभय देत असल्याने त्यांच्यावर कारवाई झाली नाही. यामुळे या मुख्याध्यापक आणि त्यांना अभय देणाऱ्यांवर कारवाई करावी या मागणीसाठी आजपासून जिल्हाधिकारी कार्यालय समोर रहेमत बेगम अजमत आल्लाह खान या आज दि.१४ पासून बेमुदत उपोषणाला सुरुवात केली आहे. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. केमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र. १५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ अन्वये मिल्लीया प्राथमिक शाळा (मुलांची), मिल्लीया प्राथमिक शाळा (कन्या), मिल्लीया माध्यमिक शाळा (मुलांची), ४) मिल्लीया माध्यमिक शाळा (कन्या) येथील चारही मुख्याध्यापकांवर कारवाई करण्याबाबत राज्य माहिती




आयोग यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षण विभाग जिल्हा परिषद, बीड यांना आदेशीत केलेले आहे. परंतु कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी/कर्मचारी यांनी सबंधित संस्था व शाळा » पान २ वर

#### खाजगी घराची दुरुस्ती सुरू असल्याने

## शासकीय निवासस्थान सोडले नाही : धनंजय मुंडे

**मुंबई । किसान न्युज**



शहरातील सातपुडा हे शासकीय निवासस्थान मी रिक्त केले नसल्याबाबत माध्यमांमध्ये वेगवेगळ्या बातम्या येत आहेत. पण मुंबईतील माझी खाजगी सदनिका (घर) सध्या राहण्या योग्य नसून, त्याठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू आहे. अशी प्रतिक्रिया आ.धनंयमुंडे यांनी दिली आहे. शिवाय माझ्या लहान मुलीची शाळा याच भागात असून माझ्या विविध आजारांवरील उपचारार्थ देखील मला मुंबईत राहणे गरजेचे आहे. मात्र या परिसरात तातडीने भाड्याने घर मिळणे सध्या कठीण आहे, माझा शोध ही सुरु आहे. माझ्या सदनिकेचे काम पूर्ण होताच मी शासकीय निवासस्थान रिक्त करणार असून, तशी शासनाकडे विनंती केली आहे.

#### राष्ट्रीय एकात्मतेसाठी

## उद्या भव्य तिरंगा मोटारसायकल रॅली मोठ्या संख्येने उपस्थित राहावे : एजाज, भोसकर

**बीड । किसान न्युज**

येत्या १५ ऑगस्ट मंगलवार रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्ताने दरवर्षीप्रमाणे यावेळीही एआयएमआयएम च्या बीड शहरातील



बशीरगंज येथील मुख्य कार्यालयात ध्वजारोहण साठी पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तसेच जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पक्षाचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी तेथील स्थानिक कार्यालयात सुद्धा ध्वजारोहण करावे. असे आवाहन पक्षाचे मा जिल्हा उपाध्यक्ष तथा बीड तालुकाध्यक्ष शेख एजाज खन्ना भैय्या आणि बीड मा शहराध्यक्ष शिवाजीराव भोसकर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे. या विषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, एआयएमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार अल्हाज बॅरिस्टर असदुद्दीन ओवैसी यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा मा खासदार इम्तियाज जलील, यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी आपल्या भारत देशाच्या राष्ट्रीय सणांना पक्षाच्या मुख्य कार्यालयात ध्वजारोहण करत साजरे करून प्रत्येकाच्या मनात राष्ट्रभक्तीचे स्पुलिंग पेटवितो. यावेळीही स्वातंत्र्य दिनाच्या दिनानिमित्त » पान २ वर




**बीड :- येथील रेल्वे स्टेशनवर व फलकांवर ऊर्दू भाषेतून नावे लिहण्यात यावी या मागणीसाठी मौलाना आझाद युवा मंच यांच्याकडून आज गुरुवार (दि.१४) पासून जिल्हाधिकारी कार्यालय समोर यावेळी मराठवाडा अध्यक्ष अरफात खान यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू करण्यात आले. यावेळी आदी पदाधिकारी उपस्थित होते.**

## सुट्टीची सूचना

**उद्या दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवारी स्वातंत्र्य दिनानिमित्त दैनिक किसान कार्यालयाला सुट्टी असल्याने उद्या शुक्रवारी अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, विक्रेते यांनी नोंद घ्यावी.**

**–व्यवस्थापक**




#### मालमत्ता प्रकरणी मुलाच्या तक्रारी वरुन

## वडील अन् भावावर फसवणुकीचा गुन्हा दाखल

**बीड । किसान न्युज**

कष्टाने कमावलेल्या पैशांचा गैरवापर करणारे स्वतःचे कुटुंबीयच असतील तर काय करावे? असाच धक्कादायक प्रकार बीडमध्ये घडला आहे. सौदी अरेबियामध्ये गेल्या १६ वर्षांपासून कष्टाने काम करून पैसे पाठवणाऱ्या मुलाला त्याच्या निवृत्त मुख्याध्यापक वडिलांनी आणि धाकट्या भावाने फसवले आहे. निसार पी. निजाम शेख यांनी बीड शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांनी गेल्या १६ वर्षांपासून सौदी अरेबियामध्ये नोकरी करून पाठवलेल्या पैशांतून बीड शहर आणि परिसरात विविध प्लॉट, गाळे आणि जागा खरेदी केल्या होत्या. या सर्व मालमत्ता प्रथम आई-वडील आणि भावाच्या नावावर घेतल्या होत्या आणि नंतर स्वेच्छेने हिबानाम्याद्वारे निसार यांच्या नावावर केल्या होत्या. या प्रकरणी बीड शहर पोलिसांनी खालील व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे: वडील निजाम आमीर शेख- भाऊ इम्रान निजाम शेख फरहीन इम्रान शेख- साहील मोहम्मद मोबीन- शेख आलीम बाबू वर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३३६(२), ३१८(४), ३४०(२), ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) आणि ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास अधिकारी: हेड कॉन्स्टेबल चव्हाण यांच्याकडे पुढील तपास आहे.

## आदित्य डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांची दंत वेदांत परिषदेत उल्लेखनीय कामगिरी

### पोस्टर स्पर्धेत आदित्य डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रथम व द्वितीय पारितोषिके पटकावले

**बीड । किसान न्युज**

MIDSR डेंटल कॉलेज, लातूर येथे आयोजित राज्यस्तरीय कॉस्मेटिक डेन्टिस्ट्री परिषद आदित्य डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत यशस्वी आणि गौरवशाली ठरली. या परिषदेचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रातील विविध डेंटल महाविद्यालयांमधून बी.डी.एस. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, ज्ञानाची देवाण-घेवाण आणि व्यावसायिक कौशल्याचा उत्कर्ष. यामध्ये आदित्य डेंटल कॉलेजच्या विद्यार्थ्यांची दंत वेदांत परिषदेत उल्लेखनीय कामगिरी पोस्टर स्पर्धेत प्रथम व द्वितीय पारितोषिके पटकावले. या परिषदेत आदित्य डेंटल कॉलेजच्या तब्बल ४५ » पान २ वर




स्थानिक सोने चांदीचे भाव..
पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
9850643058
सोने २४ कॅरेट 100,300
२२ कॅरेट 98,000
चांदी प्रतिकिलो 115,000